शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे

शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.

दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१८

## महत्त्वाची सूचना

### ई-स्कॉलरशीपकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याची शासन प्रणाली

### (ST/SC/OBC/SBC/VJ/NT Category Students)

**FY/SY/TY B.Com./B.A./B.M.S./BBI/B.Sc.(IT) & M.Com. Part I/II** मधील ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाने फीमध्ये सवलत दिली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की त्यांनी Freeship/Scholarship चे ऑनलाईन अर्ज भरुन त्यासोबत खाली नमूद केलेली कागदपत्रे जोडून महाविद्यालयात जमा करणे अनिवार्य आहे. त्याची अंतिम मुदत **३० नोव्हेंबर, २०१८** आहे. तरी सदर विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर ऑनलाईन अर्ज करावे. ऑनलाईन अर्ज न केल्यास तो विद्यार्थी सरकारच्या फी सवलतीस पात्र होणार नाही व त्यास महाविद्यालयाचे उर्वरित पूर्ण शुल्क भरावे लागेल याची नोंद घ्यावी. **द्वितीय व तृतीय वर्षाच्या वर्गात शिकणा-या विद्यार्थ्यांनीही ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.**

**विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी :**

सन २०१८-१९ पासून विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाकडून नव्याने तयार करण्यात आलेल्या राज्यस्तरीय डिबीटी पोर्टल **https://mahadbtmahait.gov.in** वर देण्यात आलेल्या **User Manual / FAQ** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टलवर दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपर्यन्त न थांबता** संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावेत. ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नित नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावेत.

**https://mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर जाऊन **'नवीन अर्जदार नोंदणी' (New Applicant Registration)** वर क्लिक करुन माहिती भरल्यानंतर आपणांस आपला युजर आयडी मिळेल. त्याची आपल्याकडे नोंद करुन ठेवावी. त्यानंतर पुन्हा लॉगइन करुन आपणांस मिळालेला युजर आयडी व आपण स्वत: ठरविलेला पासवर्ड टाकून अर्ज व्यवस्थित भरावा. अर्ज भरल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट आऊट काढून खाली नमूद केलेल्या कागदपत्रांसहित पुढील कार्यवाहीकरिता महाविद्यालयीन कार्यालयात जमा करावा.

**शिष्यवृत्ती अर्ज भरण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्याने आपला आधार क्रमांक राष्ट्रीयकृत बँकेमध्ये जाऊन बँक खात्याशी संलग्न (लिंकअप) करावा जेणेकरुन शिष्यवृत्तीसंबंधी सर्व लाभ मिळणे सुलभ होईल.**

| Category | Income Limit for | |
|---|---|---|
| | Scholarship | Freeship |
| SC | Upto Rs.2,50,000/- | Above Rs.2,50,000/- |
| OBC/SBC/VJNT | Upto Rs.1,00,000/- | Above Rs.1,00,000/- but upto Rs.8,00,000/- |

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) दहावी, बारावी व गतवर्षाची गुणपत्रिकेची सत्यप्रत
२) जातीचा दाखला सत्यप्रत (Caste Certificate)
३) तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (Income Certificate)
४) महाराष्ट्र राज्याचा अधिवास दाखला (Domicile Certificate)
५) राष्ट्रीयकृत बँकेमध्ये बचत खाते असलेल्या पासबुकची झेरॉक्स (IFSC & MICR कोडसहीत)
६) **नॉन क्रिमी लियर प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate)** फक्त **फ्रिशीपच्या** विदयार्थ्यांसाठी (Only for OBC, SBC & VJNT Category students and whose income is more than Rs.1,00,000)
७) महाविद्यालयीन फी भरलेली पावती, रेशन कार्ड, आधार कार्ड सत्यप्रत

टीप : 1) विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत **श्री. डी.एन्. पवार** यांच्याशी संपर्क साधावा.

2) **FY/SY/TY B.M.S./B.Sc.(IT)** या अभ्यासक्रमांसाठी **OBC/SBC/VJNT** प्रवर्गांना मिळणारी **शिष्यवृत्ती शासनातर्फे बंद करण्यात आली आहे** याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य